23-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/22/2025 11:25 PM Page 1



## निवडक

### नादोडाच्या सरपंचपदी विश्वजा हळदणकर



■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. २२ : नादोडा पंचायत सरपंच पदावर विश्वजा हळदण कर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मंगळवारी सकाळी पंचायत कार्यालयात निवडीचे सोपस्कार पूर्ण करण्यात आले. यावेळी पंचायत निवडणुकीसाठी विश्वजा हळदण कर यांचा एक मात्र अर्ज दाखल करण्यात आला होता. ग्रामपंचायत एकूण पाच सदस्य असून माजी सरपंच व विद्यमान पंच सदस्य परेश गावस व पंच सदस्य प्रसाद नादोडकर यांनी पाठिंबा दर्शविला. अलिखित करारानुसार परेश गावस यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यामुळेच हे पद रिक्त झाले होते.

---

### भोलानाथ, मिनेजिस टीसी फिडरवर उद्या खंडित वीज पुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : भोलानाथ आणि मिनेजिस टीसी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २४ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत मार्केट यार्ड आणि सभोवतालच्या भागात वीजपूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे अश्विनी डीटीसी कुडतरी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अश्विनी आणि तिंबेटी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### पारोडा फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : ११ केव्ही पारोडा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २४ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत मिनेजिस भाट, कामराभाट, पाद्रीभाट, दोन खुरीस, ओयलेमळ आणि बेनाभाट भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे ११ केव्ही उसगांव फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २४ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत केरयें आणि कचरा प्रक्रिया प्रकल्प भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### गोवा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण मंडळाची स्वायत्त संस्था म्हणून नोंद

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : गोवा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण मंडळाची आता सोसायटी नोंदणी कायदा, १८६० (केंद्रीय कायदा २१, १८६०) अंतर्गत स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाली आहे आणि आता ती १ एप्रिल २०२५ पासून पूर्ण स्वायत्त संस्था म्हणून कार्यरत राहील.

---

### केळशी येथे आज लहान शस्त्रांव्दारे गोळीबार प्रशिक्षण

■ टीम दैनिक हेराल्ड

दाबोळी, दि. २२ : दाबोळी येथील आयएनएस हंसाने बुधवार दि. २३ रोजी केळशी रेंज येथे लहान शस्त्रांचा गोळीबार प्रशिक्षण आयोजित केल्याची माहिती दिली आहे. गोळीबार रेंज आसपासच्या लोकाना आणि मालमत्तेला कोणताही धोका नाही. रहिवाशांना गोळीबाराच्या आवाजाने न घाबरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तथापि, केळशी हे धोक्याच्या क्षेत्रात येत असल्याने रहिवाशांना त्याच्या शेजारील समुद्रकिनाऱ्यांवर जाण्यास मनाई आहे. केळशी रेंजच्या २ किमी अंतरावर समुद्रात मासेमारी, नौका मनोरंजन नौकानाही प्रतिबंध आहे. त्यासाठी नागरिकांनी आणि नाविकांनी वरील काळात धोक्याच्या ठिकाणी प्रवेश करू नये असे आयएनएस हंसाच्या कमांडिंग अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

---

### काणकोण पालिका क्षेत्रातील भंगार अड्ड्यावर कारवाई करण्याची मागणी



■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २२ : काणकोण नगरपालिका क्षेत्रातील बेकायदेशीर भंगारकामांबाबत नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी मुख्याधिकारी काणकोण मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले. नगरसेवक शुभम कोमरपंत म्हणाले की, त्यांच्या सहकाऱ्यांनी यापूर्वी विविध तक्रारी करूनही त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. हे भंगारकाम समाजासाठी त्रासदायक ठरत आहेत, काणकोण हे आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र आहे आणि हे भंगारकाम आमच्या सुंदर काणकोणला उद्ध्वस्त करत आहेत, ज्यावर मुख्याधिकारी यांनी लवकरात लवकर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असल्याचे सांगितले.

# ‘माझी बस’ योजनेला बसमालक संघटनेचा विरोध

## इंधन अनुदानाची रक्कम तत्काळ वितरित करावी : ऑल गोवा बस ओनर्स असोसिएशनची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२** : ‘माझी बस’ योजना राबविण्यापूर्वी राज्य सरकारने प्रलंबित इंधन अनुदानाची रक्कम तत्काळ वितरित करावी, अशी ठाम मागणी ऑल गोवा बस ओनर्स असोसिएशनने केली आहे. गोव्यातील विविध भागांतील बस मालकांच्या बैठका सुरू असून, त्यांनी या योजनेला विरोध दर्शवला आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष सुदीप ताम्हणकर यांनी दिली.

परिवहन विभाग आणि कदंबा ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर ताम्हणकर म्हणाले, कदंबा कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकांनी ‘माझी बस योजना २०२५’च्या मसुद्याचे स्पष्टीकरण दिल्यानंतर आम्ही त्यांना सांगितले की आम्ही हा मसुदा आधीच अभ्यासलेला आहे आणि त्यातील सर्व तपशील आमच्यासमोर स्पष्ट आहेत. मात्र, आम्ही या योजनेवर कोणतीही चर्चा करणार नाही, जोपर्यंत २०१८ ते मार्च २०२० पर्यंतचे प्रलंबित इंधन अनुदान वितरित केले जात नाही.

ताम्हणकर यांनी सांगितले की फोंडा आणि वास्को येथे बस मालकांच्या बैठका आधीच पार पडल्या असून, लवकरच मडगाव आणि कुडचडे येथेही बैठका आयोजित करण्यात येणार आहेत. या बैठकींमध्ये बहुसंख्य बस मालकांनी माझी बस’ योजनेला विरोध नोंदवला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी अधिक माहिती देताना सांगितले की सुधारित ‘माझी बस’ योजनेत प्रति किलोमीटर दर ३० रुपये निश्चित करण्यात आला असून, वार्षिक विमा प्रीमियम २०,००० रुपयांवरून ३०,००० रुपये करण्यात आला आहे. तसेच, पूर्वी बस खरेदीसाठी मिळणारे २ लाख रुपयांचे अनुदान आता १० लाख रुपये करण्यात आले आहे. सरकारकडून या योजनेअंतर्गत सरकारी नोकरी आणि मुलांचे लग्न जुळविण्याच्या आश्वासनाचाही समावेश करण्यात आला आहे. मात्र, आम्हाला या आश्वासनांवर विश्वास नाही. आधी थकित अनुदान द्या आणि मगच योजनेवर चर्चा करू, अशी भूमिका ताम्हणकर यांनी स्पष्ट केली.

ताम्हणकर यांनी यापूर्वीच्या माझी बस’ योजनेचाही उल्लेख करत सांगितले की, २०२३ मध्ये सुरू झालेल्या योजनेला फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. तेव्हा सरकारकडून फक्त ५७ बस मालकांनाच निधी मिळाला. दोन वर्षांत ११.६६ कोटी रुपये खर्च करण्यात आले, त्यातील एकट्या आमदार नीलेश काब्राल यांच्या चार बससाठीच १.७ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती समोर आली आहे. आम्हाला अशा पायलट प्रोजेक्टच्या नावाखालील फसव्या योजना नको आहेत, असा आरोप त्यांनी केला.

इंधन अनुदान योजना ही अधिसूचित आणि शाश्वत योजना असून, ती सरकारने प्रामाणिकपणे राबवावी, अशी मागणी करताना ताम्हणकर म्हणाले, मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्री सध्या केवळ चेकपोस्टवर लक्ष केंद्रीत करत आहेत. आम्हाला चेकपोस्टवर आंदोलन करण्यास भाग पाडू नये. आमची थकित रक्कम लवकरात लवकर द्या आणि त्यानंतरच माझी बस’ योजनेवर पुढील विचार केला जाईल.

## लाचखोर पीआयला निलंबीत करण्याची शिफारस करणार : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२** : कोकण रेल्वे पोलिस स्टेशन, मडगाव येथे उघडकीस आलेल्या लाचखोरी प्रकरणावर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) उशिरा रात्री छापा टाकत हेड कॉन्स्टेबल हुसेन याला रंगेहाथ अटक केली असून, पोलिस निरीक्षक सूनील गुडलर यालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

ही कारवाई बेळगाव येथील एका बकरी मांस व्यवसायिकाच्या तक्रारीनंतर करण्यात आली. संबंधित व्यापाऱ्याने आरोप केला की, एका फौजदारी प्रकरणापासून सुटका मिळवण्यासाठी निरीक्षक गुडलर याने त्याच्याकडून दोन लाख रुपये आणि दरमहा २५,००० रुपयांची लाच मागितली होती. ही मागणी हेड कॉन्स्टेबल हुसेन याच्यामार्फत पोहोचवण्यात आल्याचेही समोर आले आहे.

एसीबीने सापळा रचून पोलिस निरीक्षकाच्या कार्यालयात २५,००० रुपयांची आगाऊ रक्कम स्वीकारताना हुसेन याला अटक केली. त्यानंतर गुडलर याच्या केबिनमधील ड्रॉवरमधून चिन्हांकित रोख रक्कम जप्त करण्यात आली.या प्रकरणी माहिती देताना एसीबीचे पोलीस अधीक्षक नेल्सन अल्बुकर्क यांनी सांगितले, दोन्ही अधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. संबंधित सर्व पुरावे जप्त करण्यात आले आहेत. दोघांच्या निलंबनाची शिफारस संबंधित विभागाकडे केली जाईल.

दरम्यान, तक्रारदार व्यापाऱ्याने असा दावाही केला आहे की, ३० मार्च रोजी नोंदविण्यात आलेल्या एका गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नसताना, पोलिसांनी त्याला अटक करण्याची धमकी दिली होती.

# पेडे जंक्शनवर उड्डाणपूल बांधण्यास केंद्राची मंजुरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२** : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ (एनएच-६६) वरील पेडे जंक्शनजवळ वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि रस्ते सुरक्षा सुधारण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या ठिकाणी वाहन अंडरपास/उड्डाणपूल उभारण्यासाठी ३३.३१ कोटी रुपयांची निविदा अधिकृतपणे जाहीर केली आहे.

प्रस्तावित उड्डाणपूल एनएच-६६ च्या ५०२.३७ किलोमीटर बिंदूपासून अंदाजे २०० मीटर अंतरावर, पणजीच्या दिशेने असलेल्या सध्याच्या जंक्शनच्या जवळ उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या कामात उड्डाणपूलाचे संपूर्ण बांधकाम आणि दोन्ही बाजूंच्या संपर्क रस्त्यांचा समावेश असेल.

निविदा प्रक्रिया कार्यकारी अभियंता ज्यूड कार्व्हालो (कार्य विभाग सातवा, एनएच) यांच्या देखरेखीखाली राबविण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ५४० दिवसांची म्हणजेच अंदाजे दीड वर्षांची मुदत निश्चित करण्यात आली आहे. निविदा उघडण्याची अंतिम तारीख ८ मे २०२५ अशी आहे.

पेडे, कामारखाजन आणि आकई भागातील रहिवाशांकडून गेल्या अनेक वर्षांपासून या जंक्शनवरील वाहतूक अराजकतेबाबत तक्रारी करण्यात येत होत्या. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे येथील जंक्शन ’अपघातप्रवण क्षेत्र’ म्हणून ओळखले जाऊ लागले होते. एनएच-६६ च्या विस्तारानंतर येथून जाणारी वाहतूक अधिकच वाढली असून, सर्व्हिस रोडवरून होणारी क्रॉस-क्रॉस वाहतूक ही समस्या अधिक गंभीर बनवत आहे.

या ठिकाणी शालेय विद्यार्थी, वृद्ध नागरिक आणि पादचाऱ्यांसाठी कोणतीही सुरक्षित क्रॉसिंग व्यवस्था नसल्याने त्यांच्यासाठीही मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिकांनी वेळोवेळी याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते.

नवीन उड्डाणपूल पेडे येथील जिल्हा रुग्णालय तसेच बिचोलीम आणि आसपासच्या भागांतील नागरिकांसाठी महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. यामुळे स्थानिकांना गर्दीच्या म्हापसा शहरातून न जाता, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक सुविधा केंद्रांपर्यंत अधिक सुरक्षित आणि जलद प्रवेश मिळू शकणार आहे.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होईल, अपघातांचे प्रमाण कमी होईल आणि उत्तर गोव्यातील एकूण कनेक्टिव्हिटीला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. सध्या निविदा प्रक्रिया सुरू असून स्थानिक नागरिक आणि प्रशासकीय यंत्रणा या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## एसजीपीडीए परिसरात सांडपाणी कामांमुळे वाहतूक विस्कळीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२** : दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरणाच्या (एसजीपीडीए) अंतर्गत येणाऱ्या मडगाव येथील बाजार परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सांडपाण्याच्या कामांमुळे वाहतूक व्यवस्थेचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. परिणामी, विक्रेते, स्थानिक नागरिक आणि खरेदीदार मोठ्या प्रमाणावर त्रस्त झाले असून, त्यांनी तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

बाजाराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर दिवसभर वाहनांची कोंडी दिसून येत असून, वाहनांची गती अतिशय मंदावलेली आहे. यामुळे पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागत आहे. बाजाराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ बांधकाम यंत्रसामग्री ठेवण्यात आली असून, त्यामुळे आधीच अरुंद असलेली मार्गव्यवस्था अधिकच बिघडली आहे.

शनिवार व रविवारच्या सुटीच्या दिवशी ही परिस्थिती अधिक बिकट झाली. खरेदीसाठी येणारे नागरिक व विक्रेते यांनी प्रशासनाकडून तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

ही परिस्थिती दिवसेंदिवस असह्य होत चालली आहे. आम्ही ग्राहक गमावत आहोत, कारण कोणीही अशा गोंधळात अडकायचं टाळतो, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत भाजीपाला विक्रेत्या मारिया फर्नांडिस म्हणाल्या की, काम आवश्यक आहे, याबाबत दुमत नाही. मात्र प्रशासनाने पर्यायी व्यवस्था केली पाहिजे होती.

मडगावमधील रहिवासी अनिता नाईक यांना देखील अशाच अडचणींना सामोरे जावे लागले. माझ्या गाडीला पार्किंग मिळवून बाजारात पोहोचण्यासाठी तब्बल ३० मिनिटे लागली. ना कुठे फलक, ना वाहतूक नियंत्रण . नागरिकांना स्वतःच मार्ग शोधावा लागतो, असे त्यांनी सांगितले. विक्रीत झालेल्या घटतीचा उल्लेख करत किराणा विक्रेते सलीम शेख म्हणाले की, या गोंधळामुळे ग्राहक येण्याचे टाळत आहेत. आधीच खर्च वाढत आहेत, त्यात विक्री कमी झाल्याने आम्हाला मोठा फटका बसतोय.

स्थानिक नागरिक आणि विक्रेत्यांनी वाहतूक व्यवस्थेच्या अभावावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. थोडेसे वाहतूक पोलीस तैनात केले असते, तर परिस्थिती हाताळता आली असती, असे मत काही नागरिकांनी व्यक्त केले.

दरम्यान, इतक्या तक्रारी असूनही वाहतूक विभागाने कोणतीही तात्पुरती वाहतूक यंत्रणा उभी केली नाही, किंवा अधिकृत सूचना दिल्या नाहीत. परिणामी, स्थानिक नागरिकांनी आता वाहतूक कर्मचारी तातडीने नियुक्त करण्याची, स्पष्ट मार्गदर्शक फलक लावण्याची आणि बाजारासाठी स्वतंत्र पार्किंग क्षेत्र विकसित करण्याची मागणी केली आहे.

## कळंगुटमध्ये आयपीएलवर बेकायदेशीर सट्टा; मध्य प्रदेशातील तिघांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. २२** : कळंगुट पोलिसांनी मंगळवारी सकाळी बागा येथील एका फ्लॅटवर कारवाई करत आयपीएल क्रिकेट सामन्यावर बेकायदेशीर सट्टा लावत असलेल्या मध्य प्रदेशातील तीन जणांना रंगेहाथ अटक केली. ही कारवाई अर्श नेस्ट इमारतीतील फ्लॅट क्रमांक २०३ मध्ये करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या संशयितांची ओळख अंकित राठोड (३४, भोपाळ), बादल (३२, सागर) आणि अजय (३२, सागर) अशी झाली आहे. हे तिघे कोलकाता नाईट रायडर्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील टी-२० आयपीएल सामन्यावर ऑनलाईन माध्यमातून सट्टा लावत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी मंगळवारी पहाटे १२.३५ ते २.४५ या वेळेत छापा टाकत कारवाई केली. छाप्यात आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांच्याकडून एक लॅपटॉप व सात मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या वस्तूंची एकूण अंदाजे किंमत सुमारे १.१० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी आरोपींवर गोवा, दमण आणि दीव सार्वजनिक जुगार प्रतिबंधक कायदा १९७६ च्या कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कळंगुट पोलिस करीत आहेत.

## स्थानिक टॅक्सी ऑपरेटर्सची राज्यकरण्यांकडून पाठराखण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२** : टॅक्सी क्षेत्रातील संघर्ष थांबण्याचे चिन्ह दिसत नसताना, बाणावली येथील राजकारणी आणि पंचायत सदस्यांनी सोमवारी एकत्र येऊन वार्का टुरिस्ट टॅक्सी ऑपरेटर्सच्या समर्थनार्थ आवाज उठवला. स्थानिक टॅक्सी ऑपरेटर्सच्या मतानुसार, बाहेरील टॅक्सी चालकांनी त्यांच्या व्यवसायात घुसून त्यांना त्यांच्या दशकांपूर्वीच्या कामातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

या एकतेच्या प्रदर्शनात, बाणावलीचे आमदार वेंझी व्हिएगस, सरपंच फ्लेव्हिया बॅरेटो आणि वॉरेन अलेमाव यांच्या नेतृत्वाखालील एकत्रित शिष्टमंडळाने दक्षिण गोव्याचे पोलिस अधीक्षक टिकम सिंग यांच्याकडे चर्चा केली . त्यांनी त्यांना टॅक्सी ऑपरेटर्सविरुद्ध खंडणीच्या आरोपाखाली दाखल केलेल्या एफआयआरवर चर्चा केली.

या शिष्टमंडळाने जिल्हा पोलिस प्रमुखांचे लक्ष वेधले की, कोलवा पोलिसांनी प्रकरणाची वस्तुस्थिती पडताळून न पाहता वार्का टुरिस्ट टॅक्सी ऑपरेटर्सविरुद्ध एफआयआर नोंदवला. शिष्टमंडळाने सूचित केले की, बाहेरील टॅक्सी चालक त्या विशिष्ट दिवशी स्थानिक टॅक्सी चालकांवर खंडणी घेण्याचा प्रयत्न करत होते.

आमदार वेंझी व्हिएगस यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले की, गोवा पोलिसांनी काही व्हिडिओची स्वतःहून दखल घेतली आहे, आणि खंडणीसंबंधी कोणतीही तक्रार न करता स्थानिक टॅक्सी चालकांविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे. आमचे स्थानिक टॅक्सी चालक गेल्या ३० वर्षांपासून पर्यटकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर सुरक्षितपणे पोहोचवत आहेत. त्यांच्याविरुद्ध कोणतीही खंडणीची तक्रार नाही, असे ते म्हणाले.

आमदार वेंझी यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे हस्तक्षेपाची मागणी केली असून, त्यांचा ठाम मत आहे की, या समस्येचे निराकरण करण्याची वेळ आली आहे. त्यांनी सरकारला ॲप-आधारित टॅक्सी सेवांचा वापर करून बेकायदेशीर टॅक्सी ऑपरेटरवर कडक कारवाई करण्याची मागणी केली.

वॉरेन आलेमाव यांनी स्पष्ट केले की, बाणावलीमधील राजकारणी आणि पंचायत सदस्य स्थानिक टॅक्सी चालकांच्या बाजूने एकजूट झाले आहेत. ही स्थानिक टॅक्सी चालकांच्या अस्तित्वाची लढाई आहे. आम्ही बाहेरच्या बेकायदेशीर टॅक्सी चालकांना काम करण्याची परवानगी देणार नाही, असे ते म्हणाले. सरपंच फ्लेव्हिया बॅरेटो यांनी देखील बेकायदेशीर बाह्य टॅक्सी चालकांविरुद्ध आपल्या संघर्षात स्थानिक टॅक्सी चालकांना पाठिंबा दिला आहे.

# दक्षिण गोव्यात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव गंभीर

## नागरिक आणि पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२** : दक्षिण गोव्यात भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण झालेला धोका दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करत असून, अलिकडच्या काळात घडलेल्या दोन घटनांनी हा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे.

फोंड्याच्या दुर्गाभाट भागात घडलेली पहिली घटना हादरवून टाकणारी होती. शुक्रवारी प्रार्थनेसाठी आईसोबत जाण्याची वाट पाहणाऱ्या १५ महिन्यांच्या अनाबिया शेख हिला घराबाहेर असताना भटक्या कुत्र्यांच्या टोळीने लक्ष्य केले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कुत्र्यांनी अचानक हल्ला केला आणि गंभीर जखमा केल्या.या घटनेनंतर काही दिवसांतच, बेतालभाटी



समुद्रकिनाऱ्यावर सहा वर्षांची रशियन पर्यटक मुलगी कुत्र्याच्या हल्ल्यातून जखमी झाली. खेळत असताना अचानक झालेल्या हल्ल्यामुळे ती बिथरली होती. दृष्टी मरीनचे लाईफसेव्हर्स वेळेवर हस्तक्षेप केल्याने मोठी दुर्घटना टळली. या दोन्ही घटनांमुळे भटक्या कुत्र्यांच्या समस्येचे गांभीर्य अधोरेखित झाले असून, सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक आणि अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

अतिरिक्त जिल्हाधिकारी-१ श्रीनेत कोठावळे यांनी माहिती दिली की, कुत्र्यांचे स्वतंत्र निवारा स्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांशी सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. पशुसंवर्धन विभागाने या संदर्भात एक योजना तयार केली असून, स्थानिक संस्थांना निवारा गृहासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. सर्व ग्रामपंचायती आणि नगरपालिकांनी पुढे येऊन या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी यासोबतच, लसीकरण आणि नसबंदी मोहिमांवर भर देण्यात येत असल्याची माहिती दिली. १९ एप्रिलपर्यंत केळशी ते फत्रादे या भागात ५६२ भटक्या कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे, असे कोठावळे यांनी सांगितले.

केळशी ग्रामपंचायतीचे सरपंच डिक्सन वाझ यांनीही या समस्येवर सखोल विचार करून उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त केली. गोव्यात दोन मोठी, व्यावसायिक पद्धतीने चालवलेली कुत्र्यांची निवारागृहे - एक उत्तर गोव्यात व दुसरे दक्षिणेत असणे अत्यावश्यक आहे. यासंदर्भात आम्ही मागील वर्षी प्रस्ताव सादर केला होता, आता अंमलबजावणीची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, निवारा गृहांच्या व्यवस्थापनात स्वयंसेवी संस्था आणि प्राणी कल्याण संघटनांचा सहभाग अनिवार्य आहे. अन्न, पाणी, वैद्यकीय सेवा आणि देखभाल यासाठी त्यांच्या मदतीची गरज आहे.


